# प्रो राम मेघे कॉलेज ऑफ इंजिनीअरिंग अँड मॅनेजमेंटचे रासेयो विशेष शिबिर संपन्न

## उन्नत भारत अभियान अंतर्गत करणार घन कचरा व्यवस्थापन प्रकल्प




अमरावती दि. २२ : संत गाडगे
बा अमरावती विद्यापीठ, नरावती संलग्नित व विदर्भ युथ फेअर सोसायटी, अमरावती द्वारा ालित प्रो राम मेघे कॉलेज ऑफ नीअरिंग अँड मॅनेजमेंट, बडनेरा ोल राष्ट्रीय सेवा योजनेचे विशेष दत्तक ग्राम राजुरा लटेक) येथे दिनांक ०६ वारी ते १३ जानेवारी २०१९ दरम्यान संपन्न झाले. या विशेष ीर उदघाटन व घन कचरा स्थापन प्रकल्प भूमिपूजन व्यास अध्यक्ष म्हणून विदर्भ -वेलफेअर सोसायटीचे ाध्यक्ष मा. श्री पंकजजी ख तसेच उदघाटक म्हणून संत गाडगे बाबा अमरावती ीठाचे प्र - संचालक मा. शांतजी शिंगवेकर व रासेयो । समन्वयक मा. डॉ. राजेशजी बुरंगे व श्री राजेशजी पिदडी उपस्थित होते. यावेळी राजुरा सरपंच श्री योगेशजी मेश्राम यांनी घन कचरा व्यवस्थापन प्रकल्प कार्यासाठी महाविद्यालयाला १ एकर जागा प्रदान केली आहे असे आपल्या मनोगतात जाहीर केले व या जागेवर घन कचरा व्यवस्थापन प्रकल्प उन्नत भारत अभियानातंर्गत कश्याप्रकारे स्थापन केल्या जाईल याची संपूर्ण माहिती कार्यक्रम अधिकारी तथा क्षेत्रीय समन्वयक मा: प्रा. सारंग धावडे यांनी मान्यवरांसमोर विशद केली. रासेयो या प्रकल्पांमध्ये आपली कशी भूमिका वठवू शकतात, या बद्दलचे मनोगत मा. प्राचार्य डॉ एम एस अली यांनी यावेळी नमूद केले. विशेष शिबिरादरम्यान उन्नत भारत अभियान कुटुंब सर्वेक्षण, घन कचरा व्यवस्थापन प्रकल्प बद्दल गावकऱ्यांमध्ये जनजागृती, युवा माहिती दूत प्रचार - प्रसार कार्यक्रम, स्मशानभूमीत तरुण त्रिवेणी वन स्थापना, शेती विषयक उपक्रम राबवल्या गेले. तसेच सांस्कृतिकं कार्यक्रमातून प्रभावी जनजागृती करण्यात आली. या उपक्रमासाठी मा. गट विकास अधिकारी चांदुर रेल्वे पंचायत समिती मा. श्री प्रकाशजी पोळ व शल्य चिकित्सक डॉ श्यामसुंदरजी निकम यांनी स्वतः उपस्थिती दर्शवून शिबिराचे कौतुक केले. या विशेष शिबिरादरम्यान गावकऱ्यांसाठी व्याख्यान मालेचे आयोजन केले होते, यामध्ये स्पर्धा परीक्षा यावर श्री प्रशांतजी भाग्यवंत, जीवामृत या विषयावर श्री गुळवे, मी स्त्री यावर सौ रितिकाताई देशमुख , भारत सरकार योजना यावर श्री अंबादासजी यादव व श्री रोहित देशपांडे, गट शेती यावर श्री सचिन मानकर आणि ग्राहक मंच यावर श्री सुद्राम देशमुख यांनी आपले विचार व्यक्त केले. प्रो राम मेघे कॉलेज ऑफ इंजिनीअरिंग अँड मॅनेजमेंट, बडनेरा येथील राष्ट्रीय सेवा योजनेचे विशेष शिबीर दत्तक ग्राम राजुरा (भिलटेक) येथे खऱ्या अर्थाने आम्हाला जाणीवपूर्वक उपोयोगी व सार्थक आहे असे विचार ग्रामपंचायत राजुरा यांनी समारोपीय कार्यक्रमात व्यक्त केले. यावेळी सरपंच श्री मेश्राम, उपसरपंच सौ अलकाताई सहारे, सदस्य मोरेश्वर राजूरकर, माजी सरपंच सौ कविताताई गुल्हाने, सौ रितिकाताई देशमुख, श्री मुसा भाई यांनीं भावना व्यक्त केल्या. या विशेष शिबीर कार्यक्रमात कार्यक्रम अधिकारी प्रा सारंग धावडे, सह -कार्यक्रम अधिकारी प्रा रामेश्वर इंगलकर, प्रा अतुल दहाने, प्रा आशिष सायवान, प्रा रश्मी सोनार, प्रा शुभम कदम, गट प्रमुख चि अंकुश धोटे, कु. रणी मानके, चि अझहर अली, चि यश भट्टू, चि राहुल बोरसे, कु श्रवणी इंदूरकर, कु चैताली कामडी, कु कोमल भटकर यांनी विशेष परिश्रम घेतले.विदर्भ युथ वेलफेअर सोसायटीचे अध्यक्ष मा. डॉ. नितीनजी धांडे, उपाध्यक्ष मा. डॉ हेमंत देशमुख, कोशाध्यक्ष मा. श्री पंकजजी देशमुख, सचिव मा. श्री युवराजसिंगजी चौधरी, कार्यकारी सदस्य मा. श्री नितीनजी हिवसे, मा. श्री उदयजी देशमुख, मा. प्रा. गजाननजी काळे, मा. प्रा. रागिणीताई देशमुख यांनी या विशेष शिबीर उपक्रमाचे कौतुक केले.

प्रतिदिन
अमरावती, बुधवार, 23 जनवरी 2019

# उन्नत भारत अभियान अंतर्गत घनकचरा व्यवस्थापन प्रकल्प

## मेघे कॉलेज ऑफ इंजीनियरिंग एंड मैनेजमेंट का रासेयो विशेष शिविर

प्रतिनिधि, 22 जनवरी

अमरावती- संत गाडगेबाबा अमरावती विश्वविद्यालय से संलग्नित व विदर्भ यूथ वेलफेयर सोसायटी द्वारा संचालित प्रा. राम मेघे कॉलेज ऑफ इंजीनियरिंग एंड मैनेजमेंट का बडनेरा का राष्ट्रीय सेवा योजना का विशेष शिविर दत्तक ग्राम राजूरा (भीलटेक) में हाल ही में हुआ. 8 दिवसीय शिविर का उद्घाटन व घनकचरा व्यवस्थापन प्रकल्प के भूमिपूजन समारोह के अध्यक्ष स्थान पर विदर्भ यूथ संस्था के कोषाध्यक्ष पंकज देशमुख व उद्घाटक विवि के प्र-संचालक डॉ. प्रशांत सिंगवेकर, रासेयो जिला समन्वयक डॉ. राजेश बुरंगे, राजेश पिदड़ी उपस्थित थे. राजूरा सरपंच योगेश मेश्राम ने घनकचरा व्यवस्थापन प्रकल्प के लिए कॉलेज के एक एकड़ भूमि प्रदान की. कार्यक्रम अधिकारी प्रा. सारंग धावडे ने उन्नत भारत अभियान अंतर्गत घनकचरा व्यवस्थापन प्रकल्प की विस्तृत जानकारी दी. प्राचार्य डॉ. एम.एस., अली ने शुभकामनाएं दी. शिविर दौरान उन्नत भारत अभियान परिवार सर्वेक्षण, घनकचरा व्यवस्थापन को लेकर ग्रामवासियों ने जनजागृति, युवा सूचना दूत, श्मशान भूमि में त्रिवेणी वन की स्थापना खेती के उपक्रम व सांस्कृतिक कार्यक्रम से प्रभावी जनजागृति की गई है. चांदूर रेलवे पंस के बीडीओ प्रकाश पोल व इर्विन के सीएस श्यामसुंदर निकम ने शिविर को भेंट देकर सराहना की. स्पर्धा परीक्षा पर प्रशांत भाग्यवंत, जीवामृत विषय पर गुलवे, स्त्री विषय पर रितिका देशमुख, भारत सरकार योजना पर अंबादास यादव, रोहित देशपांडे, समूह खेती सचिन मानकर, ग्राहक मंच पर सुदाम देशमुख ने ग्रामवासियों को प्रबोधन किया. शिविर को सफल बनाने में अलका सहारे, मोरेश्वर राजुरकर, कविता गुल्हाने, रितिका देशमुख, मूसा भाई, प्रा. सारंग धावडे, प्रा. रामेश्वर इंगलकर, प्रा. अतुल दहाने, प्रा. आशीष सायवान, प्रा. रश्मी सोनार, प्रा. शुभम कदम, अंकुश धोटे, रणी मानके, अजहर अली, यश भट्ट, राहुल बोरसे, श्रवणी इंदूरकर, चैताली धांडे, डॉ. हेमंत देशमुख, पंकज देशमुख, युवराजसिंग चौधरी, नितिन हिवसे, उदय देशमुख, प्रा. गजानन काले, प्रा. रागिनी देशमुख आदि का योगदान रहा.



अमरावती : मान्यवर अतिथि को सम्मान चिह्न देते हुए.

26/02/2019

हिंदुस्थान अमरावती

# विदर्भ युथ वेलफेअर सोसायटीचा पदवी वितरण सोहळा

## नेत्रदीपक आयोजन विद्यापीठाच्या गीताने झाली कार्यक्रमास सुरूवात





**विद्यापीठाच्या सुवर्णपदक यादीतील विद्यार्थी - ६**
**विद्यापीठाच्या गुणवत्ताप्राप्त यादीतील विद्यार्थी -४३**
**पदव्युत्तर पदवीधर विद्यार्थी - २४५**
**पदवीधर विद्यार्थी - १४८६**



अमरावती दि. २५ : कार्यक्रमाला विदर्भ युथ वेल्फेअर सोसायटीचे अध्यक्ष डॉ.नितीन धांडे, उपाध्यक्ष प्रा.डॉ.हेमंत देशमुख, कोषाध्यक्ष पंकज देशमुख, सचिव युवराजसिंग चौधरी, संचालक मंडळातीलं कार्यकारी सदस्य नितीन हिवसे, ॲड.उदय देशमुख, प्रा.गजानन काळे, प्रा.सौ.रागिणीताई देशमुख तसेच संस्थेच्या विविध महाविद्यालयाचे प्राचार्य यात डॉ.अमोल बोडखे, प्रो.राम मेघे इन्स्टिट्यूट ऑफ टेक्नॉलॉजी अॅन्ड रिसर्च, बडनेरा-अमरावती, डॉ.एम.एस.अली, प्रो.राम मेघे कॉलेज ऑफ इंजिनीअरींग अॅन्ड मॅनेजमेंट, बडनेरा-अमरावती, डॉ.दिलीप काळे, समाजकार्य महाविद्यालय बडनेरा, डॉ आर.एस.हावरे, कला व वाणिज्य महाविद्यालय चांदुर (रेल्वे), डॉ.लिना कांडलकर, इंदिराबाई मेघे महिला महाविद्यालय अमरावती, डॉ.राजेश गोधळेकर, दंत महाविद्यालय व रुग्णालय अमरावती, डॉ.राजेश देशमुख, बॅरी.आर.डी.आय.के. अॅन्ड एन.के.डी.महाविद्यालय बडनेरा, डॉ.शारदा गावंडे, प्रा.राजा देशमुख कला महाविद्यालय नांदगाव (खं.), तसेच कार्यक्रम समन्वयक डॉ.गजेंद्र बमनोटे त्यांच्या उपस्थितीत पडला.

यावेळी संस्थेचे सचिव युवराजसिंग चौधरी यांनी संस्थेबद्दल माहिती दिली व संस्थेच्या कार्याविषयी माहिती दिली व यशस्वी विद्यार्थांना शुभेच्छा दिल्या. संस्थेचे कोषाधक्ष पंकज देशमुख यांनी १९६५ साली स्थापण झालेल्या या संस्थेचे रोपटे आज एका मो'या वटवृक्षात झाल्याचे मत व्यक्त केले व यात संस्थापक सदस्याचा मो'ा वाटा असल्याचे मत व्यक्त केले व सर्व यशस्वी विद्यार्थांना शुभेच्छा दिल्या. संस्थेचे उपाध्यक्ष प्रा.डॉ.हेमंत देशमुख यांनी यशस्वी होण्यासाटी सतत परिश्रम आवश्यक असल्याचे मत व्यक्त केले. संस्थेचे अध्यक्ष डॉ.नितीन धांडे यांनी संस्थेची तसेच विद्यार्थ्यांची प्रगती पाहून आनंद होतो. यशस्वी होण्यासाठी प्रत्येक कामात आनंद शोधला, तर आपण मो'या प्रमाणात यश मिळू शकते, असे सांगून यावेळी त्यांनी पुढील वाटचाली सा'ी विध्यार्थ्यांना शुभेच्छा दिल्या. प्रो.राम मेघे इन्स्टिट्यूटच्या प्रांगणामध्ये या कार्यक्रमाचे भव्य आयोजन करण्यात आले होते. कार्यक्रमाचे संचालन डॉ.निकू खालसा, प्रा.मैथिली देशमुख यांनी केले. कार्यक्रमाला मो'याप्रमाणात विद्यार्थी, पालक, प्राध्यापक हजारोंच्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमाचा यशवितेसा'ी विदर्भ युथ वेल्फेअर सोसायटीच्या सर्व प्राध्यापक, कर्मचारी यांनी प्रयत्न केले.

हिंदुस्थान अमरावती
बुधवार, दि. २७ फेब्रुवारी २०१९

# प्रो. राम मेघे तंत्रज्ञान व संशोधन संस्थेमध्ये आशये चे उद्घाटन



अमरावती दि.२६ : स्थानिक प्रो. राम मेघे तंत्रज्ञान व संशोधन संस्थेमध्ये आशये चे थाटात उद्घाटन पार पडले. यावेळी गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार व पदवी वितरण सोहळा पार पडला. यावेळी व्यासपीठावर सोसायटीचे अध्यक्ष डॉ. नितीन धांडे, उपाध्यक्ष नितीन धांडे, कोषाध्यक्ष डॉ. हेमंत देशमुख, सदस्य नितीन हिवसे, अ‍ॅड उदय देशमुख, प्रा. गजानन काळे, प्रा. रागीणी देशमुख, प्राचार्य डॉ. अमोल बोडखे आदी मान्यवर उपस्थित होते.

आशये दरम्यान विविध सांस्कृतिक कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी प्राचार्य अमोल बोडखे यांनी अहवाल वाचन केले व कार्यक्रमाची माहिती दिली. नितीन हिवसे यांनी विद्यार्थ्यांना शुभेच्छा दिल्यात. सचिव युवराज सिंग यांनी विद्यार्थ्यांमध्ये असामान्य प्रतिभा असल्याचे प्रतिपादन केले. पंकज देशमुख यांनी विद्यार्थ्यांनी वाचनाकडे वळावे असे आवाहन केले. डॉ. हेमंत देशमुख यांनी विद्यार्थ्यांना आपल्या पालकांचे स्वप्न साकार करा असे आवाहन केले. यानंतर संस्थेचे अध्यक्ष डॉ. धांडे यांनी कठोर परिश्रमातून यश मिळवता येते त्याकरीता संस्था, प्राध्यापक व शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांचा मोलाचा वाटा असल्याचे मत व्यक्त केले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक, संचालन व आभार डॉ. चंद्रशेखर देशमुख यांनी केले. कार्यक्रमाला मोठ्या संख्येने विद्यार्थी उपस्थित होते.

हिंदुस्थान अमरावती | रविवार, दि. २४ मार्च २०१९

# विदर्भातील विदर्भ युथ वेलफेअर सोसायटी, अमरावतीच्या नविन कार्यकारी परीषदेची निवड

## डॉ. नितीन धांडे यांची अध्यक्षपदी, उपाध्यक्षपदी ॲड. उदय देशमुख, कोषाध्यक्षपदी प्रा. (डॉ.) हेमंत देशमुख व सचिवपदी युवराजसिंग चौधरी यांची अविरोध निवड





















अमरावती दि. २४ : विदर्भातील क्रमांक २ च्या प्रतिष्ठीत शिक्षण संस्थेची विशेष निवडणूक आमसभेमध्ये रविवार दि. २४-०३-२०१९ रोजी पार पडली या मध्ये मा. डॉ. नितीन धांडे यांची अध्यक्षपदी पुर्ननिवड झाली तसेच उपाध्यक्ष पदी मा. ॲड. उदय देशमुख, कोषाध्यक्ष पदी मा. प्रा. (डॉ.) हेमंत देशमुख, सचिव पदी मा. श्री. युवराजसिंग चौधरी व कार्यकारी परिषदेचे सदस्य म्हणुन मा. श्री. शंकरराव काळे, मा. श्री. नितीन हिवसे, डॉ. सौ. वैशाली धांडे, प्रा. रागीणी देशमुख, डॉ. सौ. पुनम चौधरी यांची अविरोध निवड झाली.

सर्वांचे लक्ष लागुण राहिलेल्या निवडणूकीमध्ये डॉ. नितीन धांडे यांची अविरोध निवड झाल्यामुळे अध्यक्ष पदामध्ये तसेच सचिव पदामध्ये कोणताही बदल झालेला नाही. नविन निर्वाचीत सदस्यामध्ये मा. श्री. शंकररावजी काळे, डॉ. सौ. वैशाली धांडे व डॉ. सौ. पुनम चौधरी यांचा समावेश नविन कार्यकारीणी परिषदेमध्ये करण्यात आला. तसेच उपाध्यक्ष पदी ॲड. उदय देशमुख तसेच *(उर्वरित पान २ वर)*

***(पान १२ वरुन)*** ***विदर्भातील विदर्भ युथ...***

कोषाध्यक्ष पदी प्रा. (डॉ.) हेमंत देशमुख यांची निवड झाली.

संस्थेचे जाळे विदर्भामध्ये पसरलेले आहे. यात २०,००० विद्यार्थी तसेच ३००० कर्मचारी कार्यरत आहेत. संस्थेचे एकुण १२ महाविद्यालये व १७ विद्यालये यामध्ये २ सी.बी.एस.ई. शाळा १ निवासी आश्रमशाळा व ६ वसतिगृहांचा समावेश आहेत.

संस्थेचे अध्यक्ष डॉ. नितीन धांडे यांनी सन २०१४ मध्ये संस्थेचा पदभार स्विकारला होता या कालावधीत संस्थेची प्रगती मोठ्या प्रमाणात झाली होती. यावेळी निवड अध्यक्ष डॉ. नितीन धांडे यांनी आजिवन सदस्यांनी माझ्यावर दाखविलेला विश्वास मी येणाऱ्या दिवसांमध्ये सिध्द करुन दाखवेल तसेच संस्थेच्या उत्तरोत्तर प्रगती करीता मी कटिबध्द आहे. असे प्रतिपादन केले. संस्थेच्या कार्यकारीणी परिषदेचे सर्वत्र अभिनंदन होत आहे.

नवभारत
अमरावती
25 मार्च 2019



# डा. धांडे निर्विरोध अध्यक्ष

## विदर्भ यूथ वेलफेयर सोसाइटी चुनाव

**अमरावती (का).** सम्पूर्ण विदर्भ में अपने नाम से जाने जाते प्रो. राम मेघे इन्स्टीट्यूट आफ रिसर्च सेंटर का संचालन कर रही विदर्भ यूथ वेलफेयर सोसायटी के पंचवार्पिक चुनाव निर्विरोध रहे. जिसमें डा. नितिन धांडे अपने कुशल व सर्वाधिक सफल कार्यकाल की बदौलत दोबारा अध्यक्ष बने. जबकि निवर्तमान कोषाध्यक्ष पंकज देशमुख की जगह प्रा. डा. हेमंत देशमुख नए कोषाध्यक्ष चुने गए.

### संस्था की प्रगति से दोबारा विश्वास

डा. धांडे ने संस्था अध्यक्ष के रूप में वर्ष 2014 में पदभार संभाला था. उनके कार्यकाल में विदर्भ यूथ वेलफेयर सोसाइटी की अभूतपूर्व प्रगति किसी से छीपी नहीं है. अपने विजन व कार्यकुशलता के लिये जाने जाते डा. धांडे के नेतृत्व पर दोबारा विश्वास कर निर्विरोध चयन हुआ. संस्था के विदर्भ में कुल 20 हजार से अधिक विद्यार्थी, 3,000 कर्मचारी है. कुल 12 कालेज, 17 विद्यालय है. जिसमें 2 सीबीएसइ व 1 निवासी आश्रमशाला व 6 होस्टल है.

### वैशाली धांडे, काले व चौधरी नए सदस्य

9 सदस्यीय कार्यकारिणी के चुनाव के लिये रविवार को दोपहर में कैम्प स्थित सोसाइटी कार्यालय में सभा का आयोजन किया गया. जिसमें सर्वानुमति से निर्विरोध चुनाव कराने का फैसला किया गया. इसके पहले भी डा. नितिन धांडे व उनकी सम्पूर्ण कार्यकारिणी का चुनाव निर्विरोध हुआ था. इस तरह विदर्भ में दूसरे नंबर की सबसे बड़ी इस शिक्षा संस्था में धांडे ने निर्विरोध चुनाव का कीर्तिमान स्थापित किया है. निर्विरोध चुनाव में युवराज चौधरी सचिव पद पर बरकरार रहे. एड. उदय देशमुख नए उपाध्यक्ष चुने गए. कार्यकारिणी परिषद में 3 नए सदस्य शंकरराव काले, डा. वैशाली नितिन धांडे, डा. पूनम युवराज चौधरी समेत प्रा. रागिनी देशमुख व नितिन हिवसे का निर्विरोध चयन हुआ.

दिव्य मराठी
divyamarathi.com
सोमवार, २५ मार्च २०१९

# 'विदर्भ युथ वेल्फेअर'च्या अध्यक्षपदी डॉ. नितीन धांडे



विदर्भ यूथ वेल्फेअर सोसायटीची नूतन कार्यकारिणी.

**प्रतिनिधी** | अमरावती

विदर्भातील दुसऱ्या क्रमांकाची शैक्षणिक संस्था असलेल्या विदर्भ युथ वेल्फेअर सोसायटीच्या अध्यक्षपदी डॉ. नितीन धांडे यांची फेरनिवड करण्यात आली आहे. संस्थेच्या कार्यालयात पार पडलेल्या निवडणुकीत नूतन कार्यकारिणीची निवड रविवारी करण्यात आली.

संस्थेच्या उपाध्यक्षपदी अॅड. उदय देशमुख, कोषाध्यक्षपदी प्रा. डॉ. हेमंत देशमुख व सचिव पदी युवराजसिंग चौधरी अविरोध निवडले. संस्थेची विशेष निवडणूक आमसभा २४ मार्चला झाली. यात कार्यकारी परिषदेचे सदस्य म्हणून शंकरराव काळे, नितीन हिवसे, डॉ. वैशाली धांडे, प्रा. रागिणी देशमुख, डॉ. पूनम चौधरी यांची अविरोध निवड झाली. निवडणुकीत डॉ. नितीन धांडे यांची अविरोध निवड झाल्याने अध्यक्ष, सचिव पदामध्ये कोणताही बदल झालेला नाही. नवीन निर्वाचित सदस्यांमध्ये शंकरराव काळे, डॉ. वैशाली धांडे, डॉ. पूनम चौधरी यांचा समावेश आहे. तसेच उपाध्यक्षपदी अॅड. उदय देशमुख तसेच कोषाध्यक्षपदी प्रा. डॉ. हेमंत देशमुख यांची निवड झाली. संस्थेचे जाळे विदर्भात पसरलेले आहे. यात २० हजार विद्यार्थी व ३ हजार कर्मचारी कार्यरत आहेत. संस्थेचे एकूण १२ महाविद्यालये व १७ विद्यालये आहेत. दोन सीबीएसई शाळा, १ निवासी आश्रमशाळा व ६ वसतिगृहांचा समावेश आहे.

पुण्य नगरी
सोमवार, २५ मार्च २०१९ । अ

# डॉ. नितीन धांडे दुसऱ्यांदा 'विदर्भ युथ'च्या अध्यक्षपदी

## उपाध्यक्षपदी ॲड. उदय देशमुख यांची वर्णी कार्यकारिणीची निवड

पुण्य नगरी / प्रतिनिधी



अमरावती : विदर्भ युथ वेलफेअर सोसायटीची निवडणूक आज (रविवारी) पार पडली. त्यामध्ये पुन्हा डॉ. नितीन धांडे यांची अध्यक्षपदी, तर उपाध्यक्षपदी ॲड. उदय देशमुख यांची अविरोध निवड करण्यात आली.

सदर निवडणुकीनंतर कोषाध्यक्षपदी प्रा. डॉ. हेमंत देशमुख, सचिव पदी युवराजसिंग चौधरी व कार्यकारी परिषदेचे सदस्य म्हणून शंकर काळे, नितीन हिवसे, डॉ. वैशाली धांडे, प्रा. रागीणी देशमुख, डॉ. पुनम चौधरी यांची अविरोध निवड झाली. त्यापैकी नवनिर्वाचित सदस्यांमध्ये शंकर काळे, डॉ. वैशाली धांडे व डॉ. पुनम चौधरी यांचा समावेश आहे. दरम्यान, संस्थेचे जाळे विदर्भामध्ये पसरलेले असून, या संस्थेत २० हजार विद्यार्थी तसेच ३ हजार कर्मचारी कार्यरत आहेत. संस्थेचे एकूण १२ महाविद्यालये व १७ विद्यालये ▸▸ पान ३ वर...

### संस्थेच्या अधिकाधिक प्रगतीसाठी प्रयत्न करू



"आजीवन सदस्यांनी माझ्यावर दाखविलेला विश्वास मी भविष्यात पुन्हा सिध्द करुन दाखवेल. तसेच संस्थेच्या उत्तरोत्तर प्रगतीकरीता मी कटिबध्द आहे.

। डॉ. नितीन धांडे

## डॉ. नितीन धांडे दुसऱ्यांदा 'विदर्भ युथ'च्या...

असून, त्यामध्ये दोन सी.बी.एस.ई. शाळा, एक निवासी आश्रमशाळा व सहा वसतिगृहांचा समावेश आहेत. संस्थेचे अध्यक्ष डॉ. नितीन धांडे यांनी सन २०१४ मध्ये संस्थेचा पदभार स्वीकारला होता. या कालावधीत झालेल्या संस्थेच्या प्रगतीत त्यांचा मोठा वाटा आहे.

लोकमत सोमवार, दि. २५ मार्च २०१९

# विदर्भ युथच्या अध्यक्षपदी डॉ. धांडे

## कार्यकारी परिषद : उदय देशमुख, हेमंत देशमुख, चौधरीही बिनविरोध

लोकमत न्यूज नेटवर्क

बडनेरा : विदर्भातील शिक्षण क्षेत्रात अग्रणी असलेल्या विदर्भ युथ वेलफेअर सोसायटीचे नवीन कार्यकारी परीषदेची निवडणूक रविवारी पार पडली. यात विद्यमान अध्यक्ष डॉ. नितीन धांडे यांची अविरोध निवड करण्यात आली.

या निवडणुकीत उपाध्यक्षपदी उदय देशमुख, कोषाध्यक्ष हेमंत देशमुख, सचिवपदी युवराजसिंग चौधरी व कार्यकारी परिषदेचे सदस्य म्हणून शंकरराव काळे, नितीन हिवसे, डॉ. वैशाली धांडे, रागीणी देशमुख, डॉ. पुनम चौधरी यांची देखील अविरोध निवड झाली. अध्यक्ष व सचिवपदांमध्ये कोणताही बदल झालेला नाही. त्याचसोबतच शंकरराव काळे, वैशाली धांडे व पुनम चौधरी यांचा समावेश नवीन कार्यकारीणी परिषदेमध्ये करण्यात आला. या संस्थेचे जाळे विदर्भात सर्वदूर पसरलेले आहे. सद्य:स्थितीत संस्थेमध्ये २० हजारांवर विद्यार्थी तसेच तीन हजारांवर कर्मचारी कार्यरत आहेत. संस्थेचे एकूण १२ महाविद्यालये, १७ विद्यालये सुरु आहेत. यामध्ये २ सी.बी.एस.ई. शाळा व एक निवासी आश्रमशाळा तसेच सहा वसतिगृहांचा समावेश आहेत.



अविरोध निवडून आलेले डॉ. धांडे, उदय देशमुख, चौधरी व अन्य कार्यकारिणी

"आजिवन सदस्यांनी दाखविलेला विश्वास सार्थ ठरवेल व संस्थेच्या उत्तरोत्तर प्रगतीकरिता आम्ही कटिबध्द आहोत.

- डॉ. नितीन धांडे, अध्यक्ष, विदर्भ युथ वेलफेअर सोसायटी.

प्रतिदिन अखबार
सोमवार, 25 मार्च, 2019

# डॉ. नितिन धांडे का दूसरी बार निर्विरोध चयन



अमरावती : दूसरी बार निर्विरोध चुने गए संस्थाध्यक्ष डॉ.नितिन धांडे अपने कार्यकारिणी सदस्यों के साथ.

## विदर्भ यूथ वेलफेयर सोसायटी की आमसभा में निर्णय

## उपाध्यक्ष अधि. उदय देशमुख, कोषाध्यक्ष प्रा.डॉ. हेमंत देशमुख व सचिव युवराजसिंह चौधरी भी निर्विरोध

प्रतिनिधि, 24 मार्च

अमरावती - विदर्भ की नंबर दो प्रतिष्ठित शिक्षा संस्था विदर्भ यूथ वेलफेयर सोसायटी की चुनावी आमसभा रविवार को हुई. इसमें डॉ.नितिन धांडे का अध्यक्ष पद पर दूसरी बार चयन किया गया. साथ ही उपाध्यक्ष पद पर एड. उदय देशमुख, कोषाध्यक्ष प्रा.डॉ.हेमंत देशमुख, सचिव युवराजसिंह चौधरी, कार्यकारी सदस्य पद के रूप में शंकरराव काले, नितिन हिवसे, डॉ. वैशाली धांडे, प्रा.राजेंद्र देशमुख, डॉ. पूनम चौधरी का भी निर्विरोध चयन किया गया. विशेष चुनाव आमसभा में नूतन कार्यकारिणी परिषद का निर्विरोध चयन होने से अध्यक्ष व सचिव पद में कोई भी बदलाव नहीं हुआ है. नवनिर्वाचित सदस्यों में शंकरराव काले, डॉ. वैशाली धांडे, डॉ.पूजन चौधरी का समावेश नूतन कार्यकारिणी परिषद में किया गया.

विदर्भ यूथ वेलफेयर सोसायटी अंतर्गत चलाई जाने वाली विविध शिक्षा संस्थाओं का जाल संपूर्ण विदर्भ में व्याप्त है. इसमें 20 हजार विद्यार्थी शिक्षा ग्रहण कर रहे ***शेष पृष्ठ 10 पर***

### आजीवन सदस्यों का विश्वास

दूसरी बार निर्विरोध निर्वाचित अध्यक्ष डॉ. नितिन धांडे ने कहा कि आजीवन सदस्यों ने मुझ पर जो विश्वास दर्शाया है वह आगामी दिनो में सिध्द कर दिखाऊंगा. साथ ही संस्था की प्रगति के लिए मैं कटिबध्द रहूंगा. संस्था और विद्यार्थी तथा कर्मचारियों का हित मेरे लिए सर्वोपरि है.

### डॉ. नितिन धांडे का दूसरी ...

हैं और 3 हजार कर्मचारी सेवा दे रहे हैं. संस्था के कुल 12 महाविद्यालय, 17 विद्यालय हैं. इसमें 2 सीबीएससी स्कूल, 1 निवासी आश्रमशाला और 6 छात्रावास का समावेश है. गौरतलब है कि संस्था के अध्यक्ष के रूप में डॉ.नितिन धांडे ने 2014 में पदभार स्वीकारा था. उनके कार्यकाल में संस्था ने प्रगति की उड़ान भरी और राज्य, राष्ट्र और अंतर्राष्ट्रीय स्तर पर संस्था का नाम रोशन हुआ. संस्था की नूतन कार्यकारिणी परिषद का सर्वत्र अभिनंदन किया जा रहा है.

तरुण भारत सोमवार, २५ मार्च २०१९

# अध्यक्षपदी डॉ. नितीन धांडे यांची फेरनिवड

## विदर्भ युथ वेलफेअर सोसायटीची नवी कार्यकारिणी अविरोध



संस्थेच्या ज्येष्ठ सभासदांसोबत उपस्थित नव्या कार्यकारिणीचे सर्व पदाधिकारी, मागे उभे असलेल्यांमध्ये मध्यभागी डॉ. नितीन धांडे

◆ अमरावती, २४ मार्च

विदर्भातील क्रमांक २ च्या विदर्भ युथ वेलफेअर सोसायटी या प्रतिष्ठित शिक्षण संस्थेच्या अध्यक्षपदी पुन्हा एकदा डॉ. नितीन धांडे यांची फेरनिवड झाली आहे.

रविवार, २४ मार्चच्या विशेष आमसभेत निवडणूक प्रक्रिया पार पडली. यामध्ये डॉ. नितीन धांडे यांची अध्यक्षपदी पुनर्निवड झाली. तसेच, उपाध्यक्षपदी ॲड. उदय देशमुख, कोषाध्यक्षपदी डॉ. हेमंत देशमुख, सचिवपदी युवराजसिंग चौधरी व कार्यकारी परिषदेचे सदस्य म्हणून शंकरराव काळे, नितीन हिवसे, डॉ. वैशाली धांडे, प्रा. रागिणी देशमुख, डॉ. पुनम चौधरी यांची अविरोध निवड झाली. सर्वांचे लक्ष लागून राहिलेल्या या निवडणुकीमध्ये डॉ. नितीन धांडे यांची अविरोध निवड झाल्यामुळे अध्यक्ष पदामध्ये तसेच सचिव पदामध्ये कोणताही बदल झालेला नाही. सदस्यामध्ये शंकरराव काळे, डॉ. वैशाली धांडे व डॉ. पुनम चौधरी यांचा नव्यानेच समावेश करण्यात आला, तसेच उपाध्यक्षपदी ॲड. उदय देशमुख व कोषाध्यक्ष पदी डॉ. हेमंत देशमुख यांची निवड झाली.

या संस्थेचे जाळे विदर्भामध्ये पसरलेले आहे. यात २० हजार विद्यार्थी, तसेच ३ हजार कर्मचारी कार्यरत आहेत. संस्थेची एकूण १२ महाविद्यालये व १७ विद्यालये आहेत. यामध्ये दोन सी.बी.एस.ई. शाळा, एक निवासी आश्रमशाळा व सहा वसतिगृहांचा समावेश आहे. संस्थेचे अध्यक्ष डॉ. नितीन धांडे यांनी सन २०१४ मध्ये संस्थेचा पदभार स्वीकारला होता. या कालावधीत संस्थेची प्रगती मोठ्या प्रमाणात झाली होती. आजीवन सदस्यांनी माझ्यावर दाखविलेला विश्वास मी येणाऱ्या दिवसांमध्ये सिद्ध करून दाखवेल, असे प्रतिपादन यावेळी अध्यक्ष डॉ. नितीन धांडे यांनी केले. ◂(तभा वृत्तसेवा)

सकाळ
२५ मार्च २०१९

# अध्यक्षपदी नितीन धांडे यांची बाजी

## विदर्भ युथ वेलफेअर सोसायटीच्या नव्या कार्यकारी परिषदेची निवड

सकाळ वृत्तसेवा

अमरावती, ता. २४ : विदर्भातील नावाजलेली शिक्षण संस्था असलेल्या विदर्भ युथ वेलफेअर सोसायटीच्या अध्यक्षपदी डॉ. नितीन धांडे यांची परत एकदा निवड झाली असून, कार्यकारी परिषदेत काही फेरबदल या वेळी झाले आहेत.

संस्थेची विशेष निवडणूक आमसभा रविवारी (ता.२४) झाली. त्यात डॉ. नितीन धांडे यांची अध्यक्षपदी फेरनिवड झाली, तर उपाध्यक्षपदाचा मान ॲड. उदय देशमुख यांना मिळाला.



" आजीवन सदस्यांनी माझ्यावर दाखविलेला विश्वास मी येणाऱ्या दिवसांमध्ये सिद्ध करून दाखवेल तसेच संस्थेच्या उत्तरोत्तर प्रगतीकरिता मी कटिबद्ध आहे.
-डॉ. नितीन धांडे,
अध्यक्ष, विदर्भ युथ वेलफेअर सोसायटी.

कोषाध्यक्ष म्हणून डॉ. हेमंत देशमुख, सचिवपदी युवराजसिंग चौधरी व कार्यकारी परिषदेचे सदस्य म्हणून शंकरराव काळे, नितीन हिवसे, डॉ. वैशाली धांडे, प्रा. रागिणी देशमुख, डॉ. पूनम चौधरी यांची बिनविरोध निवड झाली.

सर्वांचे लक्ष लागून राहिलेल्या निवडणुकीत डॉ. नितीन धांडे यांची बिनविरोध निवड झाल्यामुळे अध्यक्ष तसेच सचिवपदामध्ये कोणताही बदल झालेला नाही. नवीन निर्वाचित सदस्यांमध्ये शंकरराव काळे, डॉ. वैशाली धांडे व डॉ. पूनम चौधरी यांचा समावेश आहे.

संस्थेचे जाळे विदर्भामध्ये पसरलेले आहे. यात २० हजारांवर विद्यार्थी तसेच तीन हजार कर्मचारी कार्यरत आहेत. संस्थेचे एकूण १२ महाविद्यालये व १७ विद्यालये आहेत. त्यामध्ये दोन सीबीएसई शाळा, एक निवासी आश्रमशाळा व ६ वसतिगृहांचा समावेश आहे. डॉ. नितीन धांडे यांनी २०१४ मध्ये संस्थेचा पदभार स्वीकारला होता. या कालावधीत संस्थेची प्रगती मोठ्या प्रमाणात झाली. त्यामुळे त्यांची फेरनिवड करण्यात आली.

दैनिक भास्कर

# डा. धांडे अध्यक्ष बने, चौधरी बने सचिव



## » विदर्भ यूथ वेलफेयर सोसाइटी के हुए चुनाव

शहर प्रतिनिधि| अमरावती. विदर्भ यूथ वेलफेअर सोसायटी शिक्षा संस्था की चुनाव आमसभा में रविवार 24 मार्च को डा. नितीन धांडे की एक बार फिर अध्यक्ष पद के लिए चयन किया गया है। उपाध्यक्ष पद पर एड. उदय देशमुख, कोषाध्यक्ष प्रा.डा. हेमंत देशमुख, सचिव पद पर युवराजसिंग चौधरी व कार्यकारी परिषद के सदस्य के रूप में शंकरराव काले, नितीन हिवसे, डा. वैशाली धांडे, प्रा. रागिनी देशमुख, डा. पुनम चौधरी का निर्विरोध चयन किया गया है।

संस्था के चुनाव में एक बार फिर डा. धांडे निर्विरोध चुने जाने से अध्यक्ष पद के अलावा सचिव पद में भी किसी तरह का परिवर्तन नहीं हुआ है। नवनिर्वाचित सदस्यों में शंकरराव काले, डा. वैशाली धांडे व डा. पूनम चौधरी का समावेश है। उपाध्यक्ष पद पर एड.उदय देशमुख व डा. हेमंत देशमुख का चयन किया गया है। संस्था के अध्यक्ष डा. नितीन धांडे ने इस समय कहा कि आजीवन सदस्यों ने उन पर जो विश्वास जताया है, वह आनेवाले दिनों में सिद्ध कर दिखाएंगे। साथ ही संस्था को प्रगतिपथ पर ले जाने का हमेशा प्रयास करते रहेंगे। इस समय नवनिर्वाचित पदाधिकारियों का अभिनंदन किया गया।

२५ मार्च २०१९

जनमाध्यम

## विदर्भ युथ वेलफेअर सोसायटीच्या नविन कार्यकारी परिषदेची निवड

# डॉ.नितीन धांडे अध्यक्ष, ॲड.उदय देशमुख उपाध्यक्ष तर कोषाध्यक्षपदी प्रा.डॉ.हेमंत देशमुख



**अमरावती/प्रतिनिधी-** विदर्भातील क्रमांक २ च्या प्रतिष्ठीत शिक्षण संस्थेची विशेष निवडणूक रविवार दि. २४-०३-२०१९ रोजी पार पडली.यामध्ये डॉ. नितीन धांडे यांची अध्यक्षपदी पुनर्निवड झाली.तसेच उपाध्यक्षपदी ॲड. उदय देशमुख, कोषाध्यक्षपदी प्रा.(डॉ.) हेमंत देशमुख, सचिवपदी युवराजसिंग चौधरी व कार्यकारी परिषदेचे सदस्य म्हणुन शंकरराव काळे,नितीन हिवसे, डॉ. सौ. वैशाली धांडे, प्रा. रागीणी देशमुख, डॉ. सौ. पुनम चौधरी यांची अविरोध निवड झाली.

सर्वांचे लक्ष लागुन असलेल्या या निवडणूकीमध्ये डॉ. नितीन धांडे यांची अविरोध निवड झाल्यामुळे अध्यक्ष पदामध्ये तसेच सचिव पदामध्ये कोणताही बदल झालेला नाही. नविन निर्वाचीत सदस्यामध्ये शंकरराव काळे, डॉ. सौ. वैशाली धांडे व डॉ. सौ.

## सचिवपदी युवराजसिंग चौधरी यांची अविरोध निवड

पुनम चौधरी यांचा समावेश नविन कार्यकारीणी परिषदेमध्ये करण्यात आला. तसेच उपाध्यक्षपदी ॲड. उदय देशमुख तसेच कौषाध्यक्ष पदी प्रा.डॉ.हेमंत देशमुख यांची निवड झाली.संस्थेचे जाळे विदर्भामध्ये पसरलेले आहे. यात २०,००० विद्यार्थी तसेच ३००० कर्मचारी कार्यरत आहेत. संस्थेचे एकुण १२ महाविद्यालये व १७ विद्यालये यामध्ये २ सी.बी.एस.ई. शाळा १ निवासी आश्रमशाळा व ६ वसतिगृहांचा समावेश आहेत.संस्थेचे अध्यक्ष डॉ. नितीन धांडे यांनी सन २०१४ मध्ये संस्थेचा पदभार स्विकारला होता या कालावधीत संस्थेची प्रगती मोठ्या प्रमाणात ➡(पान ६ वर)

## डॉ.नितीन धांडे अध्यक्ष, ॲड.उदय देशमुख

झाली होती. यावेळी निवड अध्यक्ष डॉ. नितीन धांडे म्हणाले की,आजिवन सदस्यांनी दाखविलेला विश्वास येणाऱ्या दिवसांमध्ये सिध्द करुन दाखवेल.तसेच संस्थेच्या उत्तरोत्तर प्रगती करीता कटिबध्द असल्याची ग्वाही दिली.संस्थेच्या कार्यकारीणी परिषदेचे सर्वत्र अभिनंदन होत आहे.

अमरावती, गुरुवार, 28 मार्च 2019

प्रतिदिन अखबार

# जापानियों ने किसानों को दिया न्यौता

## विदर्भ यूथ वेलफेयर सोसायटी को भेंट, विद्यार्थियों के साथ की चर्चा



**प्रतिनिधि, 27 मार्च**

**अमरावती** - विदर्भ यूथ वेलफेयर सोसायटी द्वारा संचालित प्रो. राम मेघे कॉलेज ऑफ इंजीनियरिंग एण्ड मैनेजमेंट बडनेरा को जापानी शिष्ट मंडल ने भेंट देकर विद्यार्थियों के साथ चर्चा की. जापान के अभियांत्रिकी महाविद्यालय के साथ करार करने के संदर्भ में प्रस्ताव भी रखा. जापानी शिष्ट मंडल ने सोसायटी के अध्यक्ष डॉ.नितिन धांडे के साथ चर्चा की तथा यहां के किसानों को मार्गदर्शन के लिए जापान में निमंत्रित किया. शिष्टमंडल के सदस्यों ने कहा कि जापान में किसानों की कमी है. यहां के कुछ किसान अगर जापान में आ कर मार्गदर्शन करते हैं तो किसानों की संख्या में इजाफा होगा.

भविष्य में जापान के

### जापान में रोजगार के अवसर

जापानी शिष्ट मंडल ने संस्था के पदाधिकारियों से विविध मुद्दों पर चर्चा की. भविष्य में जापान में रोजगार के अवसर, जापानी भाषा का महत्व जैसे विषयों पर चर्चा की गई. संस्था के पदाधिकारियों ने प्रतिनिधि मंडल का पारंपरिक तरीके से स्वागत किया.

विश्वविद्यालय से टायफ, विद्यार्थी एक्सचेंज, प्राध्यापक एक्सचेंज तथा टेक्नोलॉजी व शोध के संदर्भ में इंस्टीट्यूट ऑफ टेक्नोलॉजिस्ट जापान की ओर से महाविद्यालय को प्रस्ताव दिया गया. प्रस्तावों पर चर्चा के लिए शिष्ट मंडल ने संस्था के कार्यालय को भी भेंट दी. जापानी भाषा का प्रशिक्षण ले रहे विद्यार्थियों के साथ चर्चा भी की. इस दौरान संस्था के अध्यक्ष नितिन धांडे, अधि. उदय देशमुख, प्रा.डॉ. हेमंत देशमुख, युवराजसिंह चौधरी, नितिन हिवसे, डॉ. एम.एस. अली आदि उपस्थित थे.

जनमाध्यम

28/03/2019

# जापनिज शिष्टमंडळाची विदर्भ युथ वेलफेअर सोसायटीला भेट



**अमरावती/का.प्र.**

भविष्यात जपान येथील विद्यापीठामध्ये टायअप्स, विद्यार्थ्यांचे एक्सचेंज, प्राध्यापकांचे एक्सचेंजसंबधी तसेच टेक्नॉलॉजी व संशोधनासंबंधी इन्स्टिट्युट ऑफ टेक्नॉलॉजिस्ट, जापान तर्फे महाविद्यालयाला प्रस्ताव देण्यात आला होता. या संबधी या प्रस्तावावर चर्चा करण्यासाठी जापनीज शिष्टमंडळाने संस्थेच्या कार्यालयास भेट दिली.

यावेळी प्रो. राम मेघे कॉलेज ऑफ इंजिनीअरींग अॅन्ड मॅनेजमेंट, बडनेरा-अमरावती या महाविद्यालयातील प्रोजेक्ट बघितले व विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले. वसंस्थेचे अध्यक्ष डॉ. नितीन धांडे, उपाध्यक्ष अॅड उदय देशमुख , कोषाध्यक्ष प्रा.डॉ. हेमंत देशमुख, सचिव युवराजसिंग चौधरी, संस्थेचे कार्यकारीणी सदस्य नितीन हिवसे व महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ एम. एस. अली यांच्या सोबत चर्चा करण्यात आली. यावेळी जपानी भाषेचे प्रशिक्षण घेतलेल्या विद्यार्थ्यांसोबत शिष्टमंडळाने चर्चा केली. भविष्यातील जपान येथे रोजगाराच्या संधी तसेच जपान भाषेचे महत्त्व यावर सखोल मार्गदर्शन केले.यावेळी संस्थेतर्फे शिष्टमंडळाचा सत्कार करण्यात आला. यावेळी डॉ. नितीन धांडे, उपाध्यक्ष अॅड. उदय देशमुख,कोषाध्यक्ष प्रा. (डॉ.) हेमंत देशमुख, सचिव युवराजसिंग चौधरी व संस्थेचे कार्यकारीणी सदस्य नितीन हिवसे व महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. एम. एस. अली उपस्थित होते.

पुण्य नगरी

बुधवार, २७ मार्च २०१९ । अमरावती

# विदर्भ युथ वेलफेअर सोसायटीचा पदग्रहण सोहळा



**पुण्य नगरी / प्रतिनिधी**

**अमरावती :** विदर्भ युथ वेलफेअर सोसायटीचा पदग्रहण सोहळा उत्साहात पार पडला. यावेळी विदर्भ युथ वेलफेअर सोसायटीचे अध्यक्ष डॉ.नितीन धांडे, उपाध्यक्ष उदय देशमुख, कोषाध्यक्ष डॉ. हेमंत देशमुख, सचिव युवराजसिंग चौधरी, तसेच कार्यकारी सदस्य शंकरराव काळे, नितीन हिवसे, प्रा.रागिणी देशमुख, डॉ. वैशाली धांडे, डॉ.पूनम चौधरी यांनी मंगळवारी संस्थेच्या कामाचा पदभार स्वीकारला. याप्रसंगी संस्थेचे कर्मचारी उपस्थित होते.

हिंदुस्थान 28/03/2019

# जापनीज शिष्ट मंडळाची विदर्भ युथ वेलफेअर सोसायटी ला भेट

## इन्स्टिट्युट ऑफ टेक्नॉलॉजीष्ट जापानचा अभियांत्रिकी महाविद्यालयाला करार करण्याबाबतचा प्रस्ताव

अमरावती दि. २७ : विदर्भ युथ वेलफेअर सोसायटी अमरावती द्वारा संचालित प्रो. राम मेघे कॉलेज ऑफ इंजिनिअरींग अँड मॅनेजमेंट, बडनेरा-अमरावती येथे विदर्भ युथ वेलफेअर सोसायटी, अमरावतीचे अध्यक्ष मा. डॉ. नितीन धांडे, उपाध्यक्ष मा. अँड उदय देशमुख, कोषाध्यक्ष मा. प्रा. (डॉ.) हेमंत देशमुख, सचिव मा. श्री. युवराजसिंग चौधरी, संचालक मंडळातील कार्यकारी सदस्य मा. श्री. शंकरराव काळे, मा. श्री. नितीन हिवसे, मा. सौ. रागिणी देशमुख, मा. डॉ. सौ. वैशाली धांडे, मा. डॉ सौ. पूनम चौधरी तसेच महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. एम. एस. अली यांच्या मार्गदर्शनात विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात येते.

भविष्यात जपान येथील विद्यापीठा मध्ये टायअप्स, विद्यार्थ्यांचे एक्सचेंज, प्राध्यापकांचे एक्सचेंजसंबधी तसेच टेक्नॉलॉजी व संशोधनासंबंधी इन्स्टिट्युट ऑफ टेक्नॉलॉजीष्ट, जापान तर्फे महाविद्यालयाला प्रस्ताव देण्यात आला होता. या संबधी या प्रस्तावावर चर्चा करण्यासाठी जापनीज शिष्टमंडळाने संस्थेच्या कार्यालयास भेट दिली. तसेच प्रो. राम मेघे कॉलेज ऑफ इंजिनीअरींग अॅन्ड मॅनेजमेंट, बडनेरा-अमरावती या महाविद्यालयातील प्रोजेक्ट बघितले व विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले.

संस्थेचे अध्यक्ष मा. डॉ. नितीन धांडे, उपाध्यक्ष मा. अँड उदय देशमुख , कोषाध्यक्ष मा. प्रा. (डॉ.) हेमंत देशमुख, सचिव मा. श्री. युवराजसिंग चौधरी, संस्थेचे कार्यकारीणी सदस्य मा. श्री. नितीन हिवसे व महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ एम. एस. अली याच्या सोबत चर्चा करण्यात आली.

यावेळी जपानी भाषेचे प्रशिक्षण घेतलेल्या विद्यार्थ्यांसोबत या वेळी शिष्टमंडळाने चर्चा केली , भविष्यातील जपान येथे रोजगाराच्या संधी तसेच जपान भाषेचे महत्त्व यावर सखोल चर्चा करण्यात आली.

यावेळी संस्थेतर्फे शिष्टमंडळाचा सत्कार करण्यात आला. यावेळी संस्थेचे अध्यक्ष मा. डॉ. नितीन धांडे, उपाध्यक्ष मा. अॅड. उदय देशमुख , कोषाध्यक्ष मा. प्रा. (डॉ.) हेमंत देशमुख, सचिव मा. श्री. युवराजसिंग चौधरी व संस्थेचे कार्यकारीणी सदस्य मा. श्री. नितीन हिवसे व महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. एम. एस. अली उपस्थित होते.

www.tarunbharat.net तरुण भारत 28/03/2019



संस्थाध्यक्ष डॉ. नितीन धांडे व अन्य पदाधिकाऱ्यांसोबत जपानचे प्रतिनिधी

# मेघे अभियांत्रिकीशी करार करण्याबाबत प्रस्ताव

## जपानच्या शिष्टमंडळाची भेट

◆ अमरावती, २७ मार्च

भविष्यात जपान येथील विद्यापीठामध्ये टायअप्स, विद्यार्थ्यांचे एक्सचेंज, प्राध्यापकांच्या एक्सचेंजसंबंधी तसेच टेक्नॉलॉजी व संशोधनासंबंधी इन्स्टिट्यूट ऑफ टेक्नॉलॉजिस्ट, जापान तर्फे प्रा. राम मेघे महाविद्यालयाला प्रस्ताव देण्यात आला होता. या संबंधी या प्रस्तावावर चर्चा करण्यासाठी जापनीज शिष्टमंडळाने संस्थेच्या कार्यालयास भेट दिली. तसेच महाविद्यालयातील प्रोजेक्ट बघितले व विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले.

संस्थेचे अध्यक्ष डॉ. नितीन धांडे, उपाध्यक्ष अँड उदय देशमुख, कोषाध्यक्ष डॉ. हेमंत देशमुख, सचिव युवराजसिंग चौधरी, संस्थेचे कार्यकारिणी सदस्य नितीन हिवसे व महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. अली यांच्यासोबत यावेळी चर्चा करण्यात आली.

यावेळी जपानी भाषेचे प्रशिक्षण घेतलेल्या विद्यार्थ्यांसोबत या शिष्टमंडळाने चर्चा केली. भविष्यातील जपान येथे रोजगाराच्या संधी, तसेच जपान भाषेचे महत्त्व यावर सखोल चर्चा करण्यात आली. यावेळी संस्थेतर्फे शिष्टमंडळाचा सत्कार करण्यात आला. ◂(*तभा वृत्तसेवा*)

हिंदुस्थान मंगळवार २ एप्रिल, २०१९

# प्रो.राम मेघे कॉलेज ऑफ इंजिनीअरिंग अँड मॅनेजमेंटच्या विद्यार्थ्यांची उतुंग भरारी

## स्वच्छ भारत समर इंटर्न अजहर अली राज्यात दुसरा



अमरावती दि. १ : विदर्भातील नामांकित व राष्ट्रीय स्वच्छ भारत पुरस्कार प्राप्त संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ संलग्नित व विदर्भ युथ वेलफेअर सोसायटी द्वारा संचालित प्रो राम मेघे कॉलेज ऑफ इंजिनीअरिंग अँड मॅनेजमेंट, बडनेरा येथील परमाणू वं दूरसंचार या शाखेत शिकत असलेला चि अजहर अली 'स्वच्छ भारत समर इंटर्नशिप २०१८' मध्ये महाराष्ट्र राज्यात दुसरा आला. महाविद्यालयातील विद्यार्थ्यांनी केंद्र सरकारच्या मानव संसाधन विकास मंत्रालय, पेयजल व स्वच्छता मंत्रालय, युवा कार्यक्रम व खेळ मंत्रायल तसेच अखिल भारतीय तांत्रिक शिक्षा परिषद यांच्या संयुक्त विद्यमाने 'स्वच्छ भारत समर इंटर्नशिप २०१८' मध्ये नोंदणी करून राजुरा, दहेगांव आणि अंजनगाव बारी या ३ गावानंमध्ये स्वच्छ भारत अभियान मोठ्याप्रमाणात राबविले. 'स्वच्छ भारत समर इंटर्नशिप २०१८' च्या पुरस्कारासाठी महाविद्यालयातून तीन विद्यार्थी प्रमुखाचे अहवाल शासनाकडे सादर करण्यात आले होते, त्यापैकी चि अजहर अली, चि संदेश डफळे व चि यश भट्ट यांचे अहवाल महाविद्यालय समितीने ३११ सहभागी विद्यार्थ्यांमधून पुढील स्पर्धेसाठी निवडले. यामधून चि अजहर अली यांचा राज्यात दुसरा क्रमांक आला व पुरस्काराची रोख रक्कम रुपये ३० हजार जाहीर झाले.

यावेळी संस्थेचे अध्यक्ष मा डॉ नितीन धांडे, उपाध्यक्ष मा उदय देशमुख, कोशाध्यक्ष मा डॉ हेमंत देशमुख सचिव मा युवराजसिंग चौधरी , संस्थेचे कार्यकारी सदस्य मा नितीन हिवसे तसेच महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ एम एस अली यांनी अझर अली याचा सत्कार केला

या यशाबद्दल त्याचे समाजातील सर्व स्तरातून कौतुक होत आहे. तरी तो आपल्या यशाचे श्रेय विदर्भ युथ वेलफेअर सोसायटी तसेच महाविद्यालय प्राचार्य, शिक्षक, सहभागी त्याची चमू व शिक्षकेत्तर कर्मचारी यांना देतो.

महाविद्यालय प्राचार्य डॉ. एम. एस अली, स्वच्छ भारत समर इंटर्नशिप २०१८ नोडल अधिकारी प्रा सारंग धावडे तसेच प्रा रामेश्वर इंगलकर, प्रा डहाणे, प्रा आशिष सायवान, प्रा शुभम कदम, प्रा रश्मी सोनार, प्रा प्रवीण खांडवे यांचे मोलाचे मार्गदर्शन लाभले. विदर्भ युथ वेलफेअर सोसायटीचे अध्यक्ष मा. डॉ. नितीनजी धांडे, उपाध्यक्ष मा. अड उदयजी देशमुख, कोशाध्यक्ष मा. प्रा डॉ हेमंत देशमुख, सचिव मा. श्री युवराजसिंग चौधरी, कार्यकारी सदस्य मा. श्री शंकररावजी काळे, मा. श्री नितीनजी हिवसे, मा. प्रा सौ रागिणीताई देशमुख, मा. डॉ. वैशालीताई धांडे, मा. डॉ पुनमताई चौधरी यांनी या उपक्रमाचे विशेष कौतुक केले.

अकोला, गुरुवार, ४ एप्रिल २०१९ | ५

दिव्य मराठी

# राज्यात ३११ स्पर्धकांमधून 'मेघे'च्या अजहरने पटकावला द्वितीय क्रमांक

प्रतिनिधी | अमरावती



मान्यवरांच्या हस्ते पुरस्कार स्वीकारताना अजहर अली.

केंद्र सरकारच्या मानव संसाधन विकास मंत्रालय, पेयजल व स्वच्छता मंत्रालय, युवा कार्यक्रम व खेळ मंत्रालय तसेच अखिल भारतीय तांत्रिक शिक्षा परिषदेच्या संयुक्त सहकार्याने स्वच्छ भारत समर इंटर्नशिप २०१८ स्पर्धा घेण्यात आली. यामध्ये संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ संलग्नित व विदर्भ युथ वेल्फेअर सोसायटीद्वारे संचालित बडनेरा येथील प्रो. राम मेघे कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग अँड मॅनेजमेंटच्या अजहर अली याने राज्यस्तरावर आपली छाप सोडत दुसरा क्रमांक पटकावला. विशेष म्हणजे स्पर्धेत सहभागी झालेल्या ३११ विद्यार्थ्यांना मागे टाकत त्याने राज्यस्तरावर द्वितीय स्थान पटकावले.

अजहर हा मेघे महाविद्यालयाच्या परमाणू व दूरसंचार शाखेच्या तिसऱ्या वर्षाचा विद्यार्थी आहे. शासनाच्या वतीने घेण्यात आलेल्या स्वच्छ भारत समर इंटर्नशिप २०१८ स्पर्धेमध्ये अजहरसह महाविद्यालयातील संदेश डफळे व यश भट्ट या विद्यार्थ्यांनीही स्पर्धेमध्ये सहभाग नोंदवला होता. स्पर्धेदरम्यान महाविद्यालयातील विद्यार्थ्यांद्वारे जिल्ह्यातील राजुरा, दहेगाव आणि अंजनगाव बारी या ३ गावांमध्ये स्वच्छ भारत अभियान राबवले.

अजहरने मिळवलेल्या यशाबद्दल समाजातील सर्वच स्तरातून त्याचे कौतुक होत आहे. यशाचे श्रेय संस्थेसह महाविद्यालयाचे प्राचार्य, प्राध्यापक, त्याची सहकारी चमू व शिक्षकेतर कर्मचारी यांना देतो. स्पर्धेत सहभागी होण्यासाठी त्याला प्राचार्य डॉ. अली यांच्या मार्गदर्शनाखाली नोडल अधिकारी प्रा. सारंग धावडे, प्रा रामेश्वर इंगलकर, प्रा. डहाणे, प्रा. आशिष सायवान, प्रा. शुभम कदम, प्रा. रश्मी सोनार, प्रा. प्रवीण खांडवे यांचे मार्गदर्शन लाभले. त्याने मिळवलेल्या यशाचे संस्थेचे कार्यकारी सदस्य शंकर काळे, नितीन हिवसे, प्रा. रागिणी देशमुख, डॉ. वैशाली धांडे, डॉ. पुनम चौधरी आदींनी त्याचे कौतुक केले.

**संस्थेद्वारे झाला सत्कार**

अजहरच्या यशाबद्दल संस्थेचे अध्यक्ष डॉ. नितीन धांडे, उपाध्यक्ष उदय देशमुख, कोषाध्यक्ष डॉ. हेमंत देशमुख, सचिव युवराज सिंग चौधरी, संस्थेचे कार्यकारी सदस्य नितीन हिवसे तसेच महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. एम. एस. अली यांनी अजहर अलीचा संस्थेच्या वतीने नुकताच सत्कार केला.




# 'विदर्भ युथ'ने सुरू केले जिल्ह्यात पहिले खासगी इंजिनिअ

**५२ वर्षांपूर्वी मुलींच्या विद्यालयाच्या रूपाने लावलेले रोपटं आज झाले शैक्षणिक वटवृक्ष, १९६५ मध्ये झाली संस्थेची स्थापना**

**विदर्भातील विद्यार्थ्यांसाठी शिक्षणाचे नवे दालन**

प्रतिनिधी | अमरावती

वैराग्यमूर्ती गाडगे महाराज, राष्ट्रसंत तुकडोजी महाराज, शिक्षणमहर्षी भाऊसाहेब देशमुख या महामानवांच्या आदर्शाने प्रेरित होऊन १ जुलै १९६५ मध्ये शहरात विदर्भ युथ वेल्फेअर संस्थेची स्थापना झाली. त्यानंतर दोनच वर्षांत संस्थेने मुलींसाठी स्वतंत्र विद्यालय सुरू करून शैक्षणिक क्षेत्रात रोपटं लावलं. पाहता पाहता आज हे रोपटं शैक्षणिक वटवृक्ष बनले आहे. संस्थेचे सद्या ११ महाविद्यालय आणि १७ शाळा सुरू आहेत. तसेच १९८३ मध्ये जिल्ह्यातील पहिले खासगी अभियांत्रिकी महाविद्यालय सुद्धा याच संस्थेने शहरात सुरू करून विदर्भातील विद्यार्थ्यांसाठी अभियांत्रिकी क्षेत्रात शैक्षणिक दालन उपलब्ध करून दिले.

तब्बल ५४ वर्षांपूर्वी रामराव मेघे, दिनकरराव देशमुख, मुरलीधर देशमुख, सुरेंद्र देशमुख, बाबुराव हिवसे, वसंतराव चौधरी, पुंडलिकराव गोहाड, रामदास धांडे, शशीकुमार देशमुख आणि शंकरराव काळे यांनी संस्थेची स्थापना करून संस्थेअंतर्गत पहिले मुलींचे विद्यालय बडनेरा येथे सुरू केले. तसेच तेथून तीन वर्षानंतर वर्धा जिल्ह्यातील बोरगाव येथे विद्यालय व कनिष्ठ महाविद्यालय सुरू केले. त्यानंतर संस्थेने आणखी काही शाळा सुरू केल्या. मात्र त्यावेळी शहरात एकमेव शासकीय अभियांत्रिकी महाविद्यालय होते. संस्थेने १९८३ मध्ये विदर्भातील पहिले खासगी अभियांत्रिकी महाविद्यालय व रिचर्स सेंटर बडनेरापरिसरात सुरूकेले. या अभियांत्रिकी महाविद्यालयामुळे शहर, जिल्ह्यासह विदर्भ व विदर्भाबाहेरील विद्यार्थ्यांना अभियांत्रिकी क्षेत्रात शिक्षणासाठी संधी उपलब्ध झाली. १९८० च्या दशकात



### इंग्रजी माध्यमाचे वाणिज्य महाविद्यालय सुरू करणार

*'युएसए'मधील 'डेलावेअर' विद्यापीठासोबत करार झाला. त्या विद्यापीठामार्फत 'क्लिनिकल ट्रायल रिसर्च'चे काम आम्ही करणार आहोत. संस्थेअंतर्गत नव्याने इंग्रजी माध्यमातून वाणिज्य महाविद्यालय सुरू करायचे आहे.*
**डॉ. एन. धांडे,** अध्यक्ष, विदर्भ युथ वेल्फेअर.

आपल्या भागात संगणकाचा फारसा आणि प्रचार झाला नसतानाही संस्थेने संगणकाचे निर्माते विदर्भपुत्र डॉ. भटकर यांच्या मदतीने सी - डॅक स्थापना केली. हे संस्थेचे ३७ वर्ष दैदिप्यमान यश होते. संस्थेने समा शहरी व ग्रामीण भागातील विद्यार्थ्य शैक्षणिक सुविधा पुरवण्यासाठी महाविद्यालयांसोबतच वसतिगृह, ग्रं वैद्यकीय, कृषी महाविद्यालय सुरू तसेच वैद्यकीय सेवा पुरवण्यासाठी भागातही मोलाची कामे केली आहेत.

**संस्थेंतर्गत सुरू अ महाविद्यालय व शाळा :** डेंटल व ॲण्ड हॉस्पिटल अमरावती, प्रो.



9/5/2019

जनमाध्यम

## राम मेघे महाविद्यालयाचा

# ‘टेक्नो-स्ट्रीम’ सलग सातव्या वर्षी उत्कृष्ट वार्षिकांक



**अमरावती/का.प्र.**

संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठाच्या वतीने आयोजित आंतरमहाविद्यालयीन वार्षिकांक स्पर्धेत व्यावसायिक गटातून प्रा. राम मेघे कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग अँड मॅनेजमेंटच्या ‘टेक्नो-स्ट्रीम’ वार्षिकांकाला उत्कृष्ट घोषित करण्यात आले. सलग सातव्या वर्षी हा मान प्रा. राम मेघे कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग अँड मॅनेजमेंट या महाविद्यालयाच्या पारड्यात पडला. महाराष्ट्र दिनी संगाबा विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. मुरलीधर चांदेकर यांच्या हस्ते प्राचार्य डॉ. अली व वार्षिकांक संपादक प्रवीण पोटे यांनी पारितोषिक स्वीकारले.

प्रा. राम मेघे कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग अँड मॅनेजमेंटच्या स्थापनेपासून ‘टेक्नो-स्ट्रीम’ वार्षिकांक प्रकाशित करण्यात येतो. संत गाडगेबाबा विद्यापीठाच्या वतीने २०१२ ते २०१७च्या वार्षिकांकांना उत्कृष्ट पारितोषिक प्रदान करण्यात आले. या वार्षिकांकाद्वारे या वर्षी नवोद्योजक (एन्टरप्रिनरशिप) या विषयावर प्रकाश टाकण्यात आला. युवकांनी देशाच्या बेरोजगारीची समस्या वार्षिकांकाद्वारे मांडली. ‘टेक्नो-स्ट्रीम’ २०१८ या वार्षिकांकात ‘चला हवा येऊ द्या’ फेम अरविंद जगताप यांची मुलाखत प्रकाशित करण्यात आली होती. साहित्य व माहितीचा खजिना याद्वारे उपलब्ध करून देण्यात आला. हा वार्षिकांक prmceam.ac.in या संकेत स्थळावर तसेच magazine या लिंकवर उपलब्ध आहे.. तांत्रिक विभागात महाराष्ट्र शासनाच्या स्थापत्य विभागाचे माजी सचिव धनंजय धवड यांची मुलाखत प्रकाशित करण्यात आली.

वार्षिकांक प्रकाशनासाठी महाविद्यालयातील प्रत्येक विभाग, राष्ट्रीय योजना कक्ष, शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांचे सहकार्य लाभले.

या यशाबद्दल विदर्भ युथ वेलफेअर सोसायटीचे अध्यक्ष डॉ. नितीन धांडे, उपाध्यक्ष अॅड. उदय देशमुख, कोषाध्यक्ष प्रा. डॉ. हेमंत देशमुख, सचिव युवराजसिंग चौधरी, कार्यकारी सदस्य प्रा. शंकर काळे, नितीन हिवसे, प्रा. रागिणी देशमुख, डॉ. वैशाली धांडे, डॉ. पूनम चौधरी, प्रा. प्रवीण पोटे, संपादकीय मंडळाचे प्रा. आवारे, प्रा. खेरकर, प्रा. सिराज खान, प्रा.परिहार, प्रा.नागे, प्रा.मानकर, प्रा. सोमवंशी, प्रा.. इंगळे, प्राचार्य डॉ. अली आदींतर्फे अभिनंदन करण्यात आले.

गुरुवार, दि. ९ मे २०१९ www.dainikhindusthan.com हिंदुस्थान अमरावती

# प्रो. राम मेघे कॉलेज ऑफ इंजीनियरिंग अ‍ॅन्ड मॅनेजमेंट महाविद्यालयाचे सुयश

## 'टेक्नो-स्ट्रीम' सलग ७ वर्षापासून उत्कृष्ट वार्षिकांकाचे मानकरी



अमरावती दि. ८ : संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठाच्या शैक्षणिक सत्र २०१७-१८ मध्ये आयोजित आंतर महाविद्यालयीन वार्षिकांक स्पर्धेत व्यावसायिक गटातुन प्रो. राम मेघे कॉलेज ऑफ इंजीनियरींग अ‍ॅन्ड मॅनेजमेंट या महाविद्यालयाच्या टेक्नो-स्ट्रीम २०१८ या वार्षिकांकास उत्कृष्ट वार्षिकांक म्हणून पारितोषिक जाहीर झाले. सदर पारितोषिकांचे वितरण १ मे २०१९ रोजी महाराष्ट्र दिनी संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठाचे कुलगुरु डॉ. मुरलीधर चांदेकर यांच्या हस्ते करण्यात आले. याप्रसंगी महाविद्यालयातर्फे प्राचार्य डॉ. एम.एस. अली, वार्षिकांक संपादक प्रा. प्रविण पी. पोटे यांनी पारितोषिक स्विकारले.

टेक्नो स्ट्रीम हे वार्षिकांक प्रो. राम मेघे कॉलेज ऑफ इंजीनियरिंग अ‍ॅन्ड मॅनेजमेंट, या महाविद्यालयाच्या स्थापनेपासूनच प्रकाशित करण्यात येत आहे. यापुर्वीच्या संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठाच्या सन २०१२ ते २०१७ च्या वार्षिकांक स्पर्धेत सलग सहा वेळा टेक्नो स्ट्रीम ने पारितोषिक पटकाविले होते. महाविद्यालयाने यामध्ये सातत्य राखले असून यावर्षीच्या देखील उत्कृष्ट वार्षिकांकाचा पुरस्कार पटकाविला आहे.

टेक्नो-स्ट्रीम २०१८ हा वार्षिकांक नवउद्योजकता या विषयावर योजला होता. महाविद्यालयीन युवकांनी देशाच्या वाढत्या बेरोजगारीच्या समस्येकडे लक्ष देवून नविन उद्योग व नोकऱ्या निर्माण केल्या पाहिजेत. नवउद्योजकता या विषयावर विविध लेखांमधुन विद्यार्थ्यांचे लक्ष वेधण्याचा प्रयत्न केला आहे. टेक्नो-स्ट्रीम - २०१८ या वार्षिकांकामध्ये चला हवा येवू द्या मधील पोस्टमनकाका यामुळे प्रसिद्ध लेखक / कवी अरविंद जगताप यांची मुलाखत घेतल्या गेली होती. या वार्षिकांकामध्ये मराठी, हिंदी, संस्कृत, इंग्रजी, उर्दू, तांत्रिक असे सहा विभागामध्ये प्राचार्य, प्राध्यापक, विद्यार्थी, कार्यालयीन कर्मचारी यांचे लेख, कविता, चित्र, विचार आदिंचा समावेश असून यामध्ये विज्ञान, तंत्रज्ञान, साहित्य, कला यांचा सुंदर मिलाप करुन महाविद्यालयाच्या विद्यार्थ्यांना साहित्य, ज्ञान, माहितीचा खजिना उपलब्ध करुन देण्यात आला. संपुर्ण वार्षिकांक तुम्ही prmceam.ac.in या वेबसाईटवर e-magazine या लिंकवर पाहू शकता.

